Cosmos Multidisciplinary Research E-Journal Online Available at www.cmrj.in
Recognized International Peer Reviewed Journal Impact Factor 4.94 ISSN No. 2456-1665

# स्त्री कामगार उध्दारक डॉ. आंबेडकर

**शिवाजी दामाजी लहाने**

**प्रस्तावना :-**

डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी कामगाराचे कष्ट जवळुन अनुभवल्यामुळे कायदामंत्री झाल्यावर त्यांनी कामगार कायदा करतांना त्यात अधिक सुधारणा केल्या. या कायद्यात स्त्रीयांचे शोषण व दुय्यमत्व काढण्यासाठी काही सुधारणा केल्या होत्या. त्यामध्ये स्त्रियांना कारखानामध्ये कायद्याकडे रात्री काम करण्याची बंदी झाली. स्त्रीयांच्या प्रसुतीत त्यांना विषेश भर पगारी रजेचा फायदा मिळावा म्हणुन विशेष प्रयत्न केले आणि प्रसती कायद्यात सुधारणा केली.

कोळसा खानीतील महीलांना कामगारांसाठी प्रसुतीलाभ (संगोपन) विधेयक मंजुर करुन घेऊन त्यांची प्रमुख तरतूदी होत्या. त्यामुळे स्त्रियांना प्रसुतीपुर्व काळात ठरावीक विश्रांती व सोयी मिळाल्या होत्या. या तरतूदी सोबत कामगारांच्या कल्याणासाठी स्त्रि-पुरुष समानते सुधारणा केल्या. डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी स्त्रीयांच्या आरोग्या विषयक सुधारणा करण्यास महत्व दिले. त्यामुळे १९३८ साली 'स्वतंत्र मजुर पक्षा' तर्फे डॉ. बाबासाहेब आंबेडकरांच्या वतीने 'पी.जे. रहिम' यांनी मुंबई प्रांत विधीमंडळात संपत्ती नियमा बाबतचे शासकिय विधेयक मांडली. हे विधेयक मांडण्यामागचा उद्देश समाजात आर्थिक विकासात अडथळा निर्माण करण्यासाठी लोकसंख्या कमी करण्यासाठी संतती नियमन धोरणावर जोर देणे, स्त्री आरोग्य सांभाळणे हा होता. या संतती नियमनात विधेयकाच्या माध्यमातून डॉ. बाबासाहेबांचे कुटूंबाचे नियोजन व्हावे यातून स्त्री बाळंत कमी व्हावी आणि त्यामुळे त्यांना कुटूंबाचे नियोजनाचे महत्व 'डॉ. बाबासाहेब आंबेडकर' यांनी पटवून दिले.

मुंबई असेंब्लीने बजेट वरील चर्चेत भाग घेतांना दि. २१ फेब्रुवारी १९२२ रोजी डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी सरकारी धोरणावर टीका केली. कर्मचारी स्त्रीयांच्या बाळंतपणात रजा मिळवण्याच्या यासंबंधी आलेल्या विधेयकाच्या जोरदार समर्थन करुन ते म्हणाले की, देशातील मातांना मातृत्वाच्या ठरावीक काळात विश्रांती मिळायलाच हवी. याचा खर्च शासनाने अथवा मालकाने सहन करायला हवा असे 'डॉ. बाबासाहेब आंबेडकर' यांनी सांगितले. त्यावेळी 'डॉ. बाबासाहेबां आंबेडकरांनी' विधीमंडळात स्त्री कामगारांची स्त्री कामगारांच्या प्रसुती काळात सवलती देण्या संबंधी विधेयक विधीमंडळात मांडण्यात आले होते. विधेयकासाठी देतांना डॉ. बाबासाहेब आंबेडकर म्हणतात प्रत्येक मातेला प्रसुती पूर्व काळात आणि प्रसुती नंतरच्या काळात काही ठरावीक काळापर्यंत विश्रांती मिळवीने हे राष्ट्राच्या दृष्टिने हिताचे आहे असे मी मानतो असे डॉ. बाबासाहेब आंबेडकरांच्या सहकार्यासाठी त्यांनी घेतलेल्या भूमीकेमुळे महिलांचा सामाजिक कार्यात सहभाग वाढला. त्यामुळे १९२७ साली काळाराम मंदीर सत्यग्रहात सहभागी होणारी तुकडी स्त्रीयांची होती. १९४४ साली हैद्राबादच्या भाषणात मार्गदर्शन करतांना डॉ. बाबासाहेब आंबेउकर म्हणाले त्यांनी पुरुषांबरोबर सार्वजनिक आयुष्यात उतरले पाहीजे. कुठल्याही पुरष वर्गापुढे जाऊन स्त्री या मागे राहिल्यात तर कुठल्याही समाजाची प्रगती होणार नाही. म्हणून स्त्रीयांनी आता पुरुषांच्या खांद्याला खांदा लावून लढले पाहीजे. म्हणजे आपले स्वातंत्र्य आपल्याला लवकर मिळेल. घराच्या परिस्थिती एवढेच तीचे मर्यादित दृष्टी नाही तर ही विशाल दृष्टी आणि सामाजिक बांधीलीकी ची जाणीव डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी स्त्रीयांमध्ये निर्माण केली. डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी स्त्रीयांना कौटुंबिक जबाबादारी स्वीकारुन सुरुवातीस त्यांनी कुटूंबात सुधारणा करण्यास सांगितले. त्यांनी स्त्रीयांना कुटूंबाबद्दल कणखर वागण्यास सांगितले.

डॉ. बाबासाहेब आंबेडकर स्त्रीयांच्या गुलामगीरीची कारणमिमांसा करताना क्रांती व प्रतिक्रांती यांवर आधारित इतिहासाचा आधार घेतात. त्यांच्या मते आर्य समाजाच्या व वर्ण व्यवस्थेच्या शोषणाला कंटाळून शूद्र आणि स्त्रीयांचा बौध्द धम्म स्विकारण्याकडे कल वाढत होता. स्त्री शुद्रांच्या आर्य सामाजाच्या शेषणाचा पाया होता. बौध्द धम्म स्वीकारणारा प्रवाह थांबवण्यासाठी मनुने मनुस्मृती लिहून स्त्रीयांवर कडक बंधन लादून त्यांना गुलामा पेक्षाही हीन वागणूक दिले असे म्हणतात.

स्त्रियांची सृजनशिलता केवळ आपल्या पुरतीच मर्यादीत न ठेवता जीवनाच्या विविध स्तंभातील कतृत्वाची उंच शिखरे गाठण्यासाठी संधी देणे यात मानवजातीचे बीजे ठेवली आहेत. ती अंकुरण्यात अधिक अनुकुल वातावरण निर्माण करावयाचे असेल तर स्त्रीयांच्या सृर्जन शीतेवरील बंधने दूर झाली पाहीजे हे लक्षात घेऊन डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी या वर्ण जाती व्यवस्थात्मक समाजात स्त्री मुक्तीचे रणशिंग फुंकले आणि आपल्या सामाजिक चळवळीत स्त्री शक्तीला सहभागी करुन घेऊन त्यांनी धम्मप्रणित गुलामगीरी विरुध्द युध्द केले.

डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांनी भारतीय स्त्री स्वातंत्र्यची संकल्पना गतिमान करण्यासाठी समाज प्रबोधनआणि कायदा या दोन्ही मार्गाचा अवलंब केला. सामाजिक चळवळीचा विचार करताना ती चळवळ फक्त पुरुषांनीच चालवू नये तर त्या चळवळीत स्त्रीयांचा देखील सहभाग असावा असा डॉ. बाबासाहेब आंबेडकरांचा प्रयत्न होता. कोणत्याही समाजाचे मोजमाप हे स्त्रीयांच्या प्रगतीच्या आधारेच केले जावे म्हणून सामाजिक चळवळीत स्त्रयांचा सहभाग असावा असे डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांना वाटायचे. त्यासाठी त्यांना ठिक ठिकाणी महिला परिष्दा भरवून स्त्री शक्तीला जागृत करण्याचा प्रयत्न केला. त्यासाठी त्यांनी घेतलेल्या महत्वाच्या महिला परिषदा व महिला विषयीचे ठराव मांडलेले आहे.

महाड येथे मार्च १९२७ रोजी केलेल्या सत्यागृह संबंधी परिषदेतील पहिला ठराव अल्पवयीन मुलींच्या लग्नाची चालबंद करावी असा होता. बेळगाव जिल्हा बहिस्कृत वर्गाची सामाजिक परिषद बेळगांव येथे २३ मार्च १९२२ रोजी झाली. त्या परिषदेतील ७ वा ठराव हा लग्नविधीत अधितक पैसे खर्च करु नये हा ठराव होता. डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी १४ ऑगस्ट १९३१ दिलेल्या भाषणात अस्पृश्य स्त्रीयांनी सर्वागीन सुधारनेसाठी झटने असे म्हणटले होते. ८ डिसेंबर १९३५ ला मुंबईच्या धर्मातरासंबंधी पहिल्या सभेत डॉ. बाबासाहेबांनी दिलेल्या भाषणाचा मुख्यस्तर 'हिंदू धर्म' रक्तपीतीचा रोग आहे. तर नायगांव येथे २७ मार्च १९३९ च्या स्वतंत्र मजुरपक्षाच्या वार्षि सर्व साधारण सभेत डॉ. बाबासाहेब आंबेडकरानी स्वतंत्र मजुर पक्षाची भिस्त स्त्रियावरच असेल अशी मांडणी केली होती. तर २० जुलै १९४२ नागपूर येथे आयोजित ऑल डिस्पेडे क्लासेस कमेन्स कॉन्फरंन्स मध्ये महिलांना उद्देशुन भाषण करताना डॉ. बाबासाहेब आंबेडकर म्हणाले की स्त्रीयांच्या प्रगतीवरच समाजाची प्रगती अवलंबुन आहे.

डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी कायद्याच्या माध्यमातून स्त्री मुक्तीसाठी केलेले कार्य ऐतिहासिक दृष्ट्या अतिशय महत्वपूर्ण आहे. भारतीय राज्यघटनेच्या माध्यमातून स्त्रियांवर लादलेली हजारो वर्षापासूनची आर्थिक सामाजिक गुलामगीरी कायद्याद्वारे नष्ट करण्यात आली. भारतीय राज्य घटनेच्या अनुच्छेद १४ व १८ यामध्ये मुलभूत अधिकार म्हणून समानतेचा अधिकार मान्य करण्यात आला. त्या अन्वये सर्व नागरीकांना कायद्यापुढे समानता प्रापत झाली आणि कायद्याने स्त्री-पुरुष यांच्यातील भेदही नष्ट करण्यात आला.

प्राचिन काळापासुन स्त्रियांच्या दर्जाचा विचार केल्यास तिला समाजात दुय्यम स्थान दिल्या गेले. मनुने तर स्त्रियांना भ्रष्ट, वाईट मार्गाने चालणाऱ्या, निष्ठुर, बेईमान, पापी, क्रोधी व व्याभिचारी

असे सांगितले आहे. त्यामुळे अशा स्त्रियांवर नियंत्रण ठेवण्यासाठी त्यांनी धार्मिक, अन्यायकारक अशा कायदा तयार केला. अशा धर्माच्या नितीनियमांचे पालन स्त्रीयांनी करावे आणि ते दुसऱ्या पीढी पर्यंत पाहचवावे ही जबाबादारी त्यांच्यावर लादण्यात आली. स्त्रियांसाठी तयार करण्यात आलेल्या कायद्याद्वारे स्त्रियाना एका पुरुषाच्या नियंत्रणाखाली स्वतंत्र राहण्यास योग्य नसलेली म्हणून तीला पारतंत्र्यात ठेवण्यात आले. त्यामुळे स्त्रीयांचे बालपणी तिचा पिता संरक्षण करतो, तरुणपती पती आणि वृध्दावस्थेत तिचे मुलं तिचे संरक्षण करतात. कोणत्याही काळात स्वतंत्र राहण्यास स्त्री योग्य नाही असे मणुनचे विचार आहे. त्यामुळे हिंदु समाजातील पुरुषास स्त्रीयांनी मुलं आणि चुलं तेवढेच रहावे गृहलक्ष्मी तेवढेच व्हावे. चुलं आणि मुलं हे त्यांच्या जिवनातील ध्येय एवढेच आहे. स्त्रीयांच्य प्रगतीची मजल जाऊ नये असे वाटत होते. यातुन स्त्रियांनी घरातील कामे पुरुषाचे वर्चस्व मान्य करुन जिवन व्यतित करावे असे त्यांना वाटत असे. हे घडण्या मागचे कारण पुरुषी स्वामीत्वाची, पुरुषी अहंकाराची भावना होती. त्यामुळे या विचारातुन हिंदु सुधारकांचा संकुचितपणा डॉ. आंबेडकरांना दिसुन आला. ब्रिटीशपुर्व काळात दिर्घकाळ भारतीय समाजात स्त्रियांना डोके वर काढण्याची संधी नव्हती. तसेच समाज सुधारक उदयाला यायलाही वाव नव्हता. ब्रिटीश भारतात अधुनिक विकासा बाबत अधुनिक विचाराने समाज सुधारकाची एक फळी निर्माण झाली.

डॉ. बाबासाहेब आंबेडकर म्हणतात की, पितृसत्ताक पध्दती आणि स्त्रीयांची गुलामगिरी हा सामाजिक विषमतेला बळकटी देणारा आधारभुत पाया आहे. हा पाया नष्ट केल्याशिवाय कुटुंबात व पर्यायाने समाजातही स्त्री पुरुष समानता प्रस्थापित होणे अशक्य आहे. ही समानता निर्माण करण्यासाठी स्त्री पुरुष समानतेची चळवळ यशस्वी करण्यासाठी डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांनी संपुर्ण हयात खर्ची केली.

महात्मा ज्योतीबा फुले यांनी या देशातील स्त्रीयांच्या मुक्तीचा विचार करतांना पुरुष प्रधान धर्म व्यवस्थेत स्त्रीया ह्या पितृसत्तेच्या गुलाम आहे. पित्तृसत्तात धर्म व्यवस्थेत स्त्रियांच्या सन्मानाचा, विकासाचा विचार न करता फक्त पुरुषांच्या विकासासाठी स्त्रीयांचा कसा वापर करता येईल यावरच पुरुष प्रधान धर्म शास्त्राने भर दिलेला आहे. बाल विवाह, विधवा प्रथा, सती प्रथा इत्यादी जाचक रुढी परंपरेच्या बेड्या स्त्रीयांच्या पायात ठेवुन त्यांचे उद्दत्तीकरण करण्यात आले. स्त्रीयांना मानसिक पातळीवर गुलाम करण्यासाठी प्रक्रिया या प्रथा परंपराने सांस्कृतीक पातळीवर पार पाडली. यामुळे वर्षानुवर्षे स्त्रीया पुरुषी सत्तेच्या दास्यत्वात खितपत पडल्या होत्या. हा विचार आधुनिक भारताच्या इतिहासात महात्मा फुले यांनी सर्वप्रथम केला. १८४८ मध्ये पुण्यात भिडे वाडा येथे मुलींसाठी पहिली शाळा काढली. महात्मा फुले यांचा वारसा डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी विकसीत केला. मनु हा स्त्रियांना स्वतंत्र देऊ इच्छित नव्हता अशा विचारांचा हिंदु धर्मा मुळे डॉ. बाबासाहेब आंबेडकर म्हणतात की, हिंदु धर्मच स्त्रियांच्या अवनतीस जबाबादार आहे. असे म्हणण्या मागचे कारण म्हणजे भारतात हिंदु धर्मातील मनुच्या कायद्यामुळे स्त्री राजकीय, आर्थिक, सांस्कृतिक दृष्ट्या परावलंबी झाली, तीची प्रगती खुंटली. त्यामुळे ती संस्कार, शिक्षण व स्वावलंबन यांच्या आभावामुळे शुद्रापेक्षा हिन मानल्या गेली. अशा परिस्थितीत डॉ. बाबासाहेब आंबेडकरांना वाटे माणसे ही जन्मत: समान आहे व ती मरे पर्यंत तशीच राहणार. असे म्हणण्या मागचे कारण डॉ. बाबासाहेब आंबेडकरांना वाटते की, व्यक्तीचे जातीमुळे विभाजन केले आहे. ते कोणत्या विवरणाचे असले तरी ते सारखेच आहे. असे त्यांना वाटते.

**समारोप**

डॉं. बाबासाहेब आंबेडकरांनी स्त्रीयांना मानवी हक्क प्रापत करुन दिले. डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांना कामगारांच्या हालअपेष्टाची जान असल्यामुळे त्यांनी सर्वच कामगारांच्या दु:खाला

वाचा फोडण्यासाठी कायद्याच्या माध्यमातून न्याय दिला. स्त्री कामगार यांच्या सर्व समस्यांना न्याय दिला. स्त्री कामगार म्हणून स्त्रियांना ज्या काही समस्या उदभवतात त्यांना समर्थपणाने डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांनी बाळंतपण रजा आरोग्य विषयी त्यांना माणून म्हणून त्यांचे हक्क प्रगती कारखान्यातील असो की खानीतील असो किंवा चहाच्या मळ्यातील मजूर असो ती सुध्दा एक बाई आहे याची जाणीव ठेवावी याची संपुर्ण चौकट डॉ. बाबासाहेब आंबेडकरा यांनी कायद्याच्या माध्यमातून निर्माण करुन सर्वच स्त्री कामगारांना न्याय दिला आहे.

डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी भारतीय स्त्री स्वातंत्र्याची संकल्पना गतिमान करण्यासाठी समाज प्रबोधन आणि कायदा या दोन्ही मार्गाचा अवलंब केला. सामाजिक चळवळीचा विचार करतांना ती चळवळ फक्त पुरुषांनाच चालु नाही तर, त्या चळवळीत स्त्रियांना देखील सहभाग असावा असा डॉ. बाबासाहेब आंबेडकरांचा प्रयत्न होता. कोणत्याही समाजाची मोजमापन हे स्त्रीयांच्या प्रगतीच्या आधारेच केले जाते. म्हणून सामाजिक चळवळीत स्त्रियांच्या सहभाग असावा असे बाबासाहेब आंबेडकरांना वाटायचे. त्यासाठी त्यांना ठिक ठिकाणी महिला परिषदा भवून स्त्री शक्तीला जागृत करण्याचा प्रयत्न केला. त्यासाठी त्यांनी घेतलेल्या महत्वाच्या महिला परिषदा व महिला विषयीचे ठराव मांडले आहे.

**संदर्भ :-**

१. डॉ. आंबेडकरी चळवळ-य.डी.फडके
२. लोकराज्य एप्रिल-२००५
३. डॉ. आंबेडकरांचे लेखन आणि भाषणे खंड-१८, भाग-१
४. भगवान चांगदेव खैरमोडे-डॉ.आंबेडकर आणि हिंदु कोडबील,-सुगाव प्रकाशन पुणे
५. डॉ. पी.ए.गवळी, बाबासाहेब आंबेडकर गौरवग्रंथ-हरि नरके, संपादक उपरोक्त
६. मून मिनाक्षी-फुले आंबेडकरी चळवळ, समता प्रकाशन नागपुर